नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. २**
**मे २०१०**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. १९ मे २०१० रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

<u>विषय क्र. ६४</u>

संदर्भ :–
१) स्थायी समिती ठराव क्र. ६२५ दि. १६/८/१९६९.
२) स्थायी समिती ठराव क्र. १३७७ दि. १६/१२/१९९७.
३) जागा मालकांतर्फे ॲड्.चौधरी यांनी पुणे महानगरपालिकेस बजावलेली खरेदी सूचना दि.१७/१०/२००८.
४) विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६ यांचे पत्र जा.क्र. एलए/२१६/९०५३, दि.२४/११/२००८.
५) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूप्रा/१०१७ दि. १२/१२/२००८ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७३१, दि. ६/१/२००९.
७) मनपा ठराव क्र. २६६, दि. २४/११/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे, पेठ बुधवार सि.स.नं. ७६७ येथील रस्तारुंदीतील बाधित मिळकतीचे भूसंपादन करण्यासाठी जागा मालकांतर्फे ॲड्.चौधरी यांनी बजावलेल्या खरेदी सूचनेनुसार सहा महिन्यांचे दरम्यान भूसंपादनाची कार्यवाही सुरु होणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षण रद्द होऊ शकते. सबब ॲड्.पी.जी.चौधरी यांनी दिलेल्या खरेदी सुचनेनुसार सि.स.नं. ७६७, ७६६, ७५२, ५२५ ते ५३५, ५६५ ते ५७५ इ. बुधवार पेठ या मिळकतींवर कलम २१०(१)(ब) अन्वये आखण्यात आलेल्या रस्तारुंदी क्षेत्राचे भूसंपादन करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे मे २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३, दि. २०/४/२०१० चा झाला आहे.)

<u>विषय क्र. ६५</u>

संदर्भ :–
१) मा. महा. आयुक्त यांचे क्र. मआ/भुप्रा/१३९, दि. १२/६/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ३०५, दि. २३/६/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे रामवाडी जकात नाका ते नविन महानगरपालिका हद्द या ६० मी.डी.पी.रस्त्याचा भूसंपादनाचा प्रस्ताव मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्रं. ११ पुणे यांचेमार्फत सुरू असून ताबे घेण्याची प्रक्रिया मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्रं. ११ पुणे यांचेमार्फत करणेत आली आहे.

मौजे लोहगांव स.नं.१३४ ही मिळकत सन १९८७ च्या मान्य विकास आराखड्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये येत नाही. परंतु सदर मिळकतीचा काही भाग ६० मी. डी. पी. रस्त्याने बाधित होत आहे.

वरील बाबीच्या अनुषंगाने पुणे–नगर रस्त्याच्या सलगतेच्या दृष्टीने मौजे लोहगांव स.नं. १३४ येथिल मिळकतीचे तडजोडीने अथवा भूसंपादन कायद्याद्वारे संपादन करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ६६**

संदर्भ :– १) मा.स्थायी समिती ठराव क्र. २६३ दि. २२/५/२००७.
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९५ दि. ३०/७/२००७.
३) मा.कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन यांचेकडील शासननिर्णय क्र. पीएमसी–३००७/१९५१/प्र.क्र. ११७/० /नवि–२२, मंत्रालय, मुंबई दि. १ एप्रिल २००८.
४) पुणे महानगरपालिकेकडून देवाची उरुळी व फुरसुंगी ग्रामस्थांना दि. १३/४/२००९ रोजी दिलेले आश्वासन.
५) मे.मेलहॅम इंजिनिअर्स प्रा.लि. या संस्थेस देण्यात आलेली वर्कऑर्डर एस.डब्ल्यू.एम./२१७ दि. ११/६/२००८.
६) मा.प्र.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/१०८ दि. २/६/२००९ चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र. ४६८ दि. ४/८/२००९.
८) मा.हनिफ शेख व मा.सुनिल बिबवे यांचे दि. ५/१२/२००९ चे फेरविचाराचे पत्र.
९) स्थायी समिती ठराव क्रं. ११७३, दि. १५/१२/२००९.

–––

स्थायी समिती ठराव क्र. ४६८ दि. ४/८/२००९ चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मे.मेलहॅम इंजिनिअर्स प्रा.लि. यांना मुंढवा सर्व्हे नं. ९ ते १४/२ येथील ५ एकर जागा भाडेपट्टा करारनाम्याने मा.प्रधानसचिव, नगर विकास मंत्रालय महाराष्ट्र शासन यांचेकडील ठराव क्र. पीएसपी १०९७/सीआर–१०४/एनआरजी–७, दि. १३/५/१९९८ ने महाराष्ट्र सरकार उर्जा व कामगार यंत्रणा, मंत्रालय, मुंबई या निर्णयानुसार १ रुपया प्रति चौ.मी. प्रतिवर्ष नाममात्र भाड्याने १०० मे.टन प्रतिदिन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प डी.बी.ओ.ओ.टी. तत्वावर राबविणेसाठी ३० वर्षे मुदतीने देण्याबाबतचा करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्र. ४६८ दि. ४/८/२००९ निरस्त करण्यात येत आहे.

**विषय क्र. ६७**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भूजिं/९६८ दि. १२/३/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १८२३, दि. २३/३/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे महानगरपालिकेच्या पेठ शिवाजीनगर येथील स्वा.सावरकर उद्योग भवन या व्यावसायिक इमारतीमधील स्वच्छता व सुरक्षेच्या कामाचा ठेका देणेकामी निविदा मागविल्या असता प्राप्त झालेल्या एकूण ३ निविदांपैकी सर्वात कमी दर देणाऱ्या क्र. १ च्या निविदाधारक ज्योत्स्ना बाबर यांनी निविदा प्रक्रियेतून माघार घेतली आहे. क्र.२ चे निविदाधारक अंकुश एंटरप्राईजेस यांना विचारणा केली असता त्यांनी दि.२९/१/२०१० रोजीच्या पत्रान्वये निविदा प्रक्रियेतील सर्वात कमी र.रुपये ३७,६५०/– (मासिक) नुसार काम करण्यास तयार आहे असे कळविले असल्याने त्यांचेकडून किमान वेतन कायद्याप्रमाणे सेवकांना वेतन अदा करणे बंधनकारक करुन त्यांना सदरचे काम ५ वर्षे कालावधीकरिता देणेकरिता तसेच क्र.१चे निविदाधारक ज्योत्स्ना बाबर यांनी निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्याने त्यांची अनामत र.रुपये १०,०००/– जप्त करणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ६८**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/१ दि. १/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १८, दि. ६/४/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ येरवडा स.क्र. १२, लक्ष्मीनगर येथील १५ व्यावसायिक बांधीव गाळे लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता प्रति गाळा सर्वात जास्त रक्कम (मासिक) प्रस्तावित करणाऱ्या

गाळा क्र.१ करिता मे. सानित सप्लायर यांची रुपये ८,१००/– ची

गाळा क्र.२ करिता श्री.इकबाल हुसेन शेख यांची रुपये १०,१०२/– ची
गाळा क्र.३ करिता श्री.सुनिल ट्रिडंट कॉन (नरेंद्र रामश्वेर दासगोयल) यांची रुपये ८,१००/– ची
गाळा क्र.४ करिता कोहिनूर साऊंड सर्व्हिस ॲण्ड लाईट डेकोरेटस यांची रुपये १०,१११/– ची
गाळा क्र.५ करिता श्री.अबीद अहसान सय्यद यांची रुपये ११,३१३/– ची
गाळा क्र.६ करिता श्री.असिफ जाफर शेख यांची रुपये ११,७८६/– ची
गाळा क्र.७ करिता श्री.मतीन मजीद शेख यांची रुपये १०,११२/– ची
गाळा क्र.८ करिता श्री.एस.एम.एस.कम्यूनिकेशन यांची रुपये १०,३१३/– ची
गाळा क्र.९ करिता श्री.फारुक गुलाम अन्सारी यांची रुपये ७,३१३/– ची
गाळा क्र.१० करिता श्री.जे.अे.गेम्स डॉट कॉम यांची रुपये १०,७८६/– ची
गाळा क्र.११ करिता श्री.कोहिनूर कन्स्ट्रक्शन यांची रुपये १०,३१३/– ची
गाळा क्र.१२ करिता श्री.समीर ट्रेडर्स यांची रुपये ८,५३१=५० ची
गाळा क्र.१३ करिता श्री.दशरथ विठ्ठल साळवे यांची रुपये ४,३१०=५० ची
गाळा क्र.१४ करिता श्री.अब्दुल वहाब लुकडे यांची रुपये ४,५००/– ची निविदा स्विकारुन ५ वर्षे कालावधीकरिता लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेस भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस व त्याअनुषंगाने संबंधितांबरोबर आवश्यक तो करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– गाळा क्र.१५ करिता केवळ दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे या गाळ्याकरिता पुरेशी स्पर्धा झालेली नसल्याने गाळा क्र. १५ करिता फेरनिविदा मागविणे योग्य होईल.)

**विषय क्र. ६९**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भूसंपादन/४ दि. १/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २०, दि. ६/४/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे पेठ बिबवेवाडी स.नं. ६७०, ६७१ इंदिरानगर लोअर पोलिस चौकीच्या पिछाडीस असलेला हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ५ वर्षे मुदतीकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी ज्ञानसागर एज्युकेशन सोसायटी यांची निविदा सर्वात जास्त र.रुपये ९,०००/– मासिक या दराची असून मनपा अपेक्षित रकमेपेक्षा र.रुपये ३,४३५/– ने जास्त असल्याने त्यांना सदरचा हॉल ताबा दिनांकापासून ५ वर्षे मुदतीसाठी निविदा शर्ती अटीप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देण्यास तसेच हॉलचा ताबा देणेपूर्वी ६ महिन्यांचे मासिक भाडे अनामत म्हणून व ३ महिन्यांचे मासिक भाडे आगाऊ स्विकारणेस तसेच मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करुन देणेस, त्याकरिता त्यांचेशी जरुर तो करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ७०**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भूसंपादन/५ दि. १/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २१, दि. ६/४/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे पेठ शिवाजीनगर, अ.भू.क्र. ५७६/२, ५७६/३ न.भू.क्र. १२१६/२, १२१६/३ येथील वाहनतळ लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी श्री.शाम निवृत्ती मारणे यांनी देऊ केलेली सर्वात जास्त प्रस्तावित मासिक र.रुपये २४,१२४/– व २.५% भाडेवाढ दरवर्षी स्विकारुन सदरचे वाहनतळ ताबा दिनांकापासून ५ वर्षांचे कालावधीकरिता निविदा शर्ती अटीनुसार लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेस व त्याअनुषंगाने त्यांचेशी करारनामा करणेस मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करुन देणेस, त्याकरिता त्यांचेशी जरुर तो करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ७१**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उपआ(ज)/९९२ दि. १९/३/२०१० चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. २६ दि. २९/३/२०१०.
३) स्थायी समिती ठराव क्रं. २६, दि. ६/४/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नांवे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा त्यांना खालील अटीवर अदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा.महा.आयुक्त यांचे या विषयपत्रालगतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या संस्थांनी जरुर तो करारनामा लिहून दिल्यानंतर संस्थांच्या नावे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा संबंधित संस्थांना अदा करणेस.

ब) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतचे परिशिष्टाध्ये नमूद केलेल्याप्रमाणे शासकीय अधिकारी यांची नेमणुक करणेस.

क) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर ती संस्था ज्या वॉर्डामध्ये येत असेल त्या वॉर्डाचे विद्यमान सभासद नेमणेस.

ड) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे परिशिष्टामध्ये नमूद केलेल्याप्रमाणे अंदाजपत्रकात एखाद्या संस्थेच्या नावामध्ये चूक/बदल झाला असल्यास, त्यांच्या नाव व पत्ता दुरुस्ती/बदल करणेस

**विषय क्र. ७२**

संदर्भ :– १) अॅड्.नगरे–दिवाण असो. यांनी श्री.अशोक मिलापचंद जैन यांचेतर्फे पुणे वानवडी स. नं.२६/४अ व २७अ/५ब या मिळकतीची पार्क आरक्षणाखालील जागा एम.आर.टी.पी.अॅक्ट १९६६ चे कलम १२७ अन्वये दि. २२/२/२०१० रोजीची प्राप्त परचेस नोटीस.
२) श्री.अशोक जैन यांना पाठविलेले पत्र जा.क्र. ३१६१ दि. २६/२/२०१०.
३) भूमीप्रापण विभागाकडील पत्र क्र. एलक्यू/०/२८६० दि. १५/३/२०१०.
४) श्री.अशोक जैन यांना पाठविलेले पत्र जा.क्र. ३४४८ दि. १५/३/२०१०.
५) मा.महा.आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/१९ दि. १३/४/२०१० चे पत्र.
६) स्थायी समिती ठराव क्रं. ७५, दि. २०/४/२०१०.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे मान्य विकास योजना आराखडा सन १९८७ मधील टी.डी.आर.अन्वये ताब्यात आलेले क्षेत्र वगळून अॅड्.नगरे दिवाण आणि असो. यांनी एम.आर.टी.पी.अॅक्ट १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या परचेस नोटीसीनुसार पार्कच्या आरक्षणाने बाधित होणाऱ्या पुणे पेठ वानवडी स.नं. २६/४अ (पा.) व २७/५ब पार्ट या मिळकतीसह उर्वरित सर्व क्षेत्रासाठी (वानवडी स.नं. २७ (पा.), २६(पा.), २८ (पा.)) एम.आर.टी.पी.अॅक्ट १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ७३**

संदर्भ :– १) मा. सह पोलिस आयुक्त आस्थापना जा. क्रं. पशा ४/इमारत/जनता वसाहत चौकी/१०/१६१६ दि.६/२/२०१०.
२) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्रं. मआ/भूसंपादन/२२ दि. १३/४/२०१० चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्रं. ७६, दि. २०/४/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे पर्वती जनता वसाहतमध्ये भवन रचना विभागाने बांधलेली पोलिस चौकी क्षेत्र १०५०.०० चौ.फुटाचा ताबा ३० वर्षे मुदतीसाठी जागा वाटप नियमावली २००८ मधील भाग क्र. १२ मधील मुद्दा क्र. २६ प्रमाणे जागा देणे शक्य होणार असल्याने मा.नगर अभियंता निश्चित करतील ती प्रिमियमची रक्कम स्विकारुन भाडेपट्टा करारनामा करणेस व पोलिस खात्यास पोलिस चौकीसाठी ताबा देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. ७४**

संदर्भ :– १) मा.अवर सचिव यांचे पत्र जा.क्र.टिपीएस–१८०६/२१२५/प्र.क्र.११९३/०८/नवि–१३, दि.३/६/२००८.
२) मा.स्थायी समितीस सादर केलेले विषयपत्र जा.क्र.मआ/नअ/११९७, दि.५/२/२००८.
३) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०६४, दि. ७/११/२००७.
४) मा.स्थायी समिती ठ.क्र.८३५, दि.१२/९/२००६.
५) मा.स्थायी समिती ठ.क्र.२९२, दि.२७/५/२००३.
६) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१०६६, दि. २१/२/२००३.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७३७, दि. २३/१०/२००८.
८) मा. सौ.मुक्ता टिळक व मा.बंडू केमसे यांची दि. १६/१२/२००८ ची उपसूचना.
९) मा.विशाल तांबे व मा.शांतीलाल मिसाळ यांची दि. १६/१२/२००८ ची उपसूचना.
१०) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९७, दि. १६/१२/२००८.
११) मनपा ठराव क्रं. २७०, दि. २४/११/२००९.

विषय – पुणे मनपा वाढीव हद्दीतील २३ गावांमधील डोंगर उताराचे कंटुर सर्वेक्षण करून १.५ या निकषानुसार डोंगरपायथ्याची हद्द निश्चित करणे या कामाचे नकाशे व अहवालाबाबत.

---

मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले. शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपाने शासनाकडे नकाशे पाठविताना सी–डॅक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार नकाशांवर बी.डी.पी.ची हद्द दर्शविलेली आहे. तथापी आता प्रशासनाने मोनार्क या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचे नकाशे सादर केलेले आहेत. याबाबत दोन्ही नकाशांमधील कडकात कडक ( Stringent of two ) नुसार कार्यवाही करावी तसेच प्रशासनाने मोनार्क या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचे नकाशे शहर सुधारणा समितीकडे सादर केलेले आहेत असे निदर्शनास आलेले आहे. काही ठिकाणी सी–डॅक व मोनार्क या दोन्ही नकाशांमध्ये बी.डी.पी.आलेले नाही. मात्र जागेवर डोंगर सदृश्य परिस्थिती आहे. मौजे बावधन स.नं.५८ मधील जमिनीच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. पौड रस्त्याच्या ब–याच उंचीवर ही मिळकत आहे. सबब सदर मिळकत बी.डी.पी. मध्ये समाविष्ट करण्यात यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे मे २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. ४, दि. २०/४/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ७५**

संदर्भ :– १) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. २/५/२००८ रोजीची नोटीस क्र.टीपीएस ४३०८/४६५/सीआर–६४/०८/नवि–११ ( राजपत्र प्रसिध्द दि. २९/५/२००८ )
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७६५, दि. ५/११/२००८ चे पत्र.
३) मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.१८४, दि. ८/१२/२००८.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २२७, दि. २७/१/२००९.
५) मनपा ठराव क्रं. २७१, दि. २४/११/२००९.

विषय – विशेष आर्थिक ( SEZ ) क्षेत्रात संबंधित महानगरपालिका / नगरपरिषदेची विकास नियंत्रण नियमावली लागू करणे व अधिसूचित क्षेत्रात ग्रॉस एरियावर आधारित ग्लोबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत.

---

मा. महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कायदा व न्याय मंत्रालय, केंद्र शासन यांनी विशेष आर्थिक क्षेत्र ( SEZ ) अधिनियम २००५ हा कायदा अंमलात आणला आहे. सदर कायद्यानुसार अंतरदेशीय एसपोर्टसाठी विशेष आर्थिक क्षेत्र ( SEZ ) झोन्सची स्थापना, विकसन व व्यस्थापन करण्याची तरतूद केली आहे. तसेच सदर विशेष आर्थिक क्षेत्राचे ( SEZ ) विकसनासाठी शासन स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४० अन्वये महानगरपालिका / अ वर्ग महानगरपालिका यांची विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण स्थापन करण्यात येत आहे. शासनाने जाहीर केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या ( SEZ ) विकसनास

महानगरपालिकेतील विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. तसेच त्याव्यतिरिक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्देशानुसार विशेष आर्थिक ( SEZ ) क्षेत्रासाठी Resolution a to h अटींवर सदर नियमावली लागू करून सदर एस.ई.झेड.क्षेत्रासाठी ग्लोबल एफ.एस.आय.अनुज्ञेय करण्यात येत आहे. शासन निदेशातील मुद्दे खालीलप्रमाणे –

१) संबंधित महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी विशेष नियोजन प्राधिकरणाचे सभासद असतील.

२) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी विशेष आर्थिक क्षेत्रामधील दिलेल्या सर्व परवानग्यांबाबत संबंधित म.न.पा.स.३ महिन्यात माहिती घ्यावी. अन्यथा सदर बांधकामास काम थांबविण्याचे अधिकारी संबंधित महानगरपालिकेस राहतील.

३) विशेष आर्थिक क्षेत्रामधील परवानगी विकास नियंत्रण नियमावलीनुसार नसल्यास त्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे राहतील.

४) विकास नियंत्रण नियमावलीत सवलत देण्याचे कोणतेही अधिकार विशेष नियोजन प्राधिकरणास राहणार नाहीत.

५) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी म.न.पा.हद्दीतील सर्व कर आकारणी व जमीन विकास निधी व इतर निधी पुणे महानगरपालिकेकडे भरणे आवश्यक आहे.

६) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी शासनास वेळोवेळी प्रगती अहवाल देणे आवश्यक आहे.

७) विशेष आर्थिक क्षेत्रामधील विकास आराखड्यातील आरक्षणे आवश्यकतेनुसार हद्दीवर आरक्षणाचे स्थलांतर करावयाचे झाल्यास म.न.पा.च्या मान्यतेनुसार कार्यवाही करणार.

८) विशेष आर्थिक क्षेत्रामधील आरक्षण ॲकोमोडेशन रिझर्वेशन ऑफ रिझर्वेशननुसार विकसित करणार.

९) विशेष आर्थिक क्षेत्रामधील नॉन बिल्डेबल आरक्षण विकसित करून म.न. पा.स मोफत हस्तांतर करण्यात येईल. तसेच सदर आरक्षणातील २५ % एफ.एस.आय.अनुज्ञेय करण्यात येईल.

वरील प्रमाणे बदल करण्यास मे.शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१अे ) नुसार कार्यवाही करण्यास हरकती सूचना मागविण्यात आल्या असून त्यावर म.न.पा.चे म्हणणे सादर करण्यास मा.उपसंचालक, नगर रचना यांनी कळविले असून, त्याच बरोबर त्यांचे कार्यालयाकडे दाखल हरकती / सूचनांवर नियोजन प्राधिकरण म्हणून म.न.पा.चे म्हणणे / अभिप्राय देण्यास कळविले आहे. शासनाचे निर्देशानुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून खालीलप्रमाणे उपसंचालक, यांचेकडे अभिप्राय / हरकत नोंदविणे योग्य होईल, असे मा.महा.आयुक्त यांचे मत असून त्याप्रमाणे उपसंचालक यांचेकडे अभिप्राय / हरकत नोंदविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) शासनाचे प्रकटनातील Resolution g मध्ये विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये येणा–या आरक्षणाचे ॲकोमोडेशन ऑफ रिझर्वेशनबाबत उल्लेख आहे. तथापि मान्य विकास आराखड्यातील काही आरक्षणे उदा.ई.डब्ल्यू.एस., एच.डी.एच.इ.मनपास बी.एस.यु.पी.प्रकल्पासाठी स्वतंत्र विकसित करावयाची असल्याने त्यामध्ये ॲकोमोडेशन ऑफ रिझर्वेशन अनुज्ञेय करण्यात येऊ नये.

२) पर्यावरणाच्या दृष्टीने हिल टॉप हिल स्लोप व ग्रीन बेल्ट या झोनमध्ये विशेष आर्थिक क्षेत्र जाहीर केल्यास सदर झोनमध्ये डी.सी.रूल नुसार ४ % चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे आवश्यक आहे.

३) मनपाच्या हद्दीतील विकसन प्रस्तावातील सर्व जमीन विकास निधी विशेष नियोजन प्राधिकरणाने मे.शासनाचे राजपत्रातील Resolution b प्रमाणे मनपाकडे जमा करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर मा.उपसंचालक यांचेकडे दाखल सूचना हरकतींवर मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतच्या तक्त्याप्रमाणे अभिप्राय कायम करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे मे २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. ५, दि. २०/४/२०१० चा झाला आहे.)

<u>विषय क्र. ७६</u>

संदर्भ – १) मे.शासन,नगर विकास विभाग,मंत्रालय मुंबई–३२ यांचे TPB ४३०७/२२२६/CR–३३४/२००७/UD–११, दिनांक १७.७.२००८ अन्वयेचे निदेश.
२) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१३४०, दि. ४/२/०९ चे पत्र.
३) मा. सुभाष जगताप व मा.अरूण धिमधिमे यांची दि. १७/७/०९ ची उपसूचना.
४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.९२, दि. १७/७/२००९.
५) मनपा ठराव क्रं. २७८, दि. २४/११/२००९.

----

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहराच्या विकास योजना आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीस महाराष्ट्र शासनाने ५ जानेवारी १९८७ रोजी मान्यता दिलेली आहे. मे.महाराष्ट्र शासनामार्फत दि. २३.७.२००७ रोजी गृह विषयक धोरण ठरविण्यात आले आहे. प्रस्तुत धोरणाचा मूळ उद्देश शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये सर्व सामान्यांना परवडतील अशा किंमतीमध्ये घरे उपलब्ध करून देणे,तसेच कमी उत्पन्न गट आर्थिक दुर्बल घटक यांचे करीता घरांची उपलब्धता करून देणे हा आहे. त्या दृष्टीने जमिनीची नियोजित विभगणी, आराखडा करताना काही टक्के सदनिका, प्लॉटस् ई.डब्ल्यू.एस.एल.आय.जी. व एम.आय.जी करीता ठेवणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने जमिनीची नियोजित विभागणी तसेच आराखडा मंजुर करतानाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नमूद नियमाव्यतिरिक्त मे.शासनाने TPB ४३०७/२२२६/CR–३३४/२००७/UD–११, दिनांक १७.७.२००८ अन्वये कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेचे निर्देश दिलेले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

१) For the sub-division of the land admeasuring 2000 sq.mt.and more,following provision shall be compulsorily provided-
(a) 10% area in the form of 30 to 50 sq.mt.plots for EWS ( Economically Weaker Section) LIG ( Lower Income Group).
(b) 10% area in the form of 50 to 100sq.mt.plots.
२) For the layout of the land,admeasuring 4000 sq.mt.and more,following provision shall be compulsorily provided-
(a) 10% tenements shall be propoed for each EWS ( Economically Weaker Section) LIG ( Lower Income Group) group (30 to 40 sq.mt.)and MIG (Middle Income Group) Group (41 to 60sq.mt.)

प्रस्तुत निर्देशांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना सुकर जावे याकरीता प्रस्तुत निर्देश कायम ठेवून त्यामध्ये काही प्रमाणात फेर बदल करणे योग्य होईल असे प्रशासनाचे मत आहे. सदरचे निर्देशानुसार विकास नियंत्रण नियमावलीत खालीलप्रमाणे नव्याने नियम क्र. १३.१(A) समाविष्ट करण्यात येत आहे.

1) For Subdivision/Layout/Amalgamation of land measuring 2000 sq.mt.& more following provision shall be compulsorily provided.
( a ) 10% area in the form of 30 to 50 sq.mt.tenaments for EWS/LIG.
(b) 10% area in the form of 50 to 100 sq.mt.tenaments & if developer proposes all such tenements in one building out of total Lay-out buildings such development permission may be granted.

2) In Case of amalgamation of two or more plots total 10%area in the form of 30 to 50 sq.m.tenements,can be shown for EWS/LIG at one side in the layout or in a single building.

3) If number of Developers having different plots (within a distance not exceeding 500 m form each other ) come forward with a combined proposal & 10% of 50 to 100 sq.m.) in one of the plots,then such development permission may be granted. In such a case the FSI on the other plots shall be 1.0 plus the TDR permissible.

अ.क्र.१ मधील १०%क्षेत्र हे २५ ते ३० स्के.मीटर बांधावयाचे सदनिका असाव्यात. तसेच १०%क्षेत्र ३० ते ५० स्के.मी.च्या असाव्यात.

सदरचा नव्याने नियम क्र. १३.१(A) डी.सी.नियमामध्ये समाविष्ट करणेसाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एम.आर.टी.पी.ॲक्ट.१९६६ चे कलम ३७(१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही करणे आवश्यक आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून दैनिंक वर्तमान पत्र व शासकीय राज पत्रात जाहिर प्रकटन देऊन नागरिकांच्या हरकती व सूचना मागविणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :– सदर विषयाचा विचार माहे मे २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. ६, दि. २०/४/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ७७**

संदर्भ :– १) मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/नअ/१०१२, दि. २३/३/२०१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ११, दि. २३/४/२०१०.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे जानेवारी १० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. च्या माहितीची नोंद घेवून मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी. आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाना पेठ, सि.स.नं.४०८, नेहरू रस्ता | ८०'०' डी.पी.रस्ता | मे.एन.जी.पी.ओ. कंन्स्ट्रक्शन तर्फे १) निखिल केतन गोखले २) पराग | ए | ६० . ७४ | ०००३८०८ | २.१.२०१० |
| २ | रास्ता पेठ, सि.स.क्र. ६३६ | ८०'०' डी.पी.रस्ता | श्री.रवि अशोक रावळ | ए | २६७.६० | ०००३८२९ | ५.१.२०१० |
| ३ | नाना पेठ, सि.स.क्र. ९३२ | ८०'०' डी.पी.रस्ता | श्री.पोपट उर्फ प्रदिप वसंत काळे | ए | २०२.०० | ०००३८४१ | ६.१.२०१० |
| ४ | बुधवार पेठ,सि.स.नं. ५०३ + ५०४ | २१०/यू/एस रस्ता | मे.समर्थ प्रॉपर्टीज तर्फे भागीदार १) देवेंद्र देवराम सातकर २) महेश हिरामन बारणे | ए | १७२.०६ | ०००३८४४ | २९.१.२०१० |

**विषय क्र. ७८**

संदर्भ :– १) मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/नअ/१०१३, दि. २३/३/२०१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १२, दि. २३/४/२०१०.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे फेब्रुवारी १० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. च्या माहितीची नोंद घेवून मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी. डी. आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हडपसर स.नं. १३३/१+२/१ व १३३/१+२/२ | २४ मी. एच.सी.एम.टी. आर. | १) दत्तात्रय डी.मगर २) मुरलीधर डी.मगर ३) सतिश डी.मगर ४) उमेश डी.मगर ५) विवेक डी.मगर | सी. | ३२७५.७८ | ३८६३ | १८.२.२०१० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ६) शिरीष मुरलीधर मगर<br>७) संध्या उमेश मगर | | | | |
| २ | महात्मा फुले पेठ, सि.टी.एस.नं.४६३ | भूमीप्रापण रस्ता रूंदी | १) ई.ए.शेख २) डी.शेख व इतर<br>१) ई.ए.शेख<br>२) टी.शेख | ए. | २१२.९२<br><br>८९.१६ | ३८४९<br><br>३८५६ | २३.२.२०१० |
| ३ | बिबवेवाडी स.नं. ६१५/२+३+४+५ +६+७+८/१ | २४.० मी. डी.पी, रोड | मे.शाह प्रमो.आणि डेव्ह. तर्फे संजय चंद्रकांत शाह, राजेश चंद्रकांत शाह | सी. | ५००.०० | ०००३८५७ | २४.२.२०१० |
| ४ | बिबवेवाडी स.नं. ६१५/२+३+४+५ +६+७+८/१ | २४.० मी. डी.पी,रोड | मे.शाह प्रमो.आणि डेव्ह. तर्फे संजय चंद्रकांत शाह, राजेश चंद्रकांत शाह | सी. | ५००.०० | ०००३८५८ | २४.२.२०१० |
| ५ | बिबवेवाडी स.नं. ६१५/२+३+४+५ +६+७+८/१ | २४.० मी. डी.पी, रोड | मे.शाह प्रमो.आणि डेव्ह. तर्फे संजय चंद्रकांत शाह, राजेश चंद्रकांत शाह | सी. | ५००.०० | ०००३८५९ | २४.२.२०१० |
| ६ | बिबवेवाडी स.नं. ६१५/२+३+४+५ +६+७+८/१ | २४.०मी. डी.पी,रोड | मे.शाह प्रमो.आणि डेव्ह. तर्फे संजय चंद्रकांत शाह, राजेश चंद्रकांत शाह | सी. | ३९३.०५ | ०००३८६० | २४.२.२०१० |
| ७ | शिवाजीनगर भांबुर्डा,टी.पी. स्कीम,फा.प्लॉ. नं.२८/१,सि.स. नं.१७१७,१७१९ ते१७२९ भैय्यावाडी | एस.आर.अे. | मे.अनुतेज अथर्व | बी. | २५३.८९ | ०००३८६२ | २६.२.२०१० |

**विषय क्र. ७९**

संदर्भ :– १) मा.सुभाष जगताप व मा.निलेश निकम यांचे दि. १०/९/२००९ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठ.क्र. १२५, दि. २८/१०/२००९
३) मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा. क्र. मआ/न.अ./१०१४, दि. २३/३/२०१० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १३, दि. २३/४/२०१०.

–––

पुणे पेठ धनकवडी स.नं.९ चे उत्तरेस शिवराय सोसा. चे जागेमधून मा.अति.महा.आयुक्त (वि) यांच्या पत्रासोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार **'अे'** ते **'बी'** पर्यंत ६.० मी. रूंदीचा पूर्व – पश्चिम रस्ता बी.पी.एम.सी.अॅक्ट कलम २०५ अन्वये आखणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ८०**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अतिमआ/उकाजा/से/११, दि. ३/४/२०१० चे पत्र.
२) मा. सुभाष जगताप, मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, मा. सुनिल गोगले, मा. शैलेश चरवड, मा. पृथ्वीराज सुतार, मा. राजेंद्र गोरडे, मा. अनिल शिरोळे, मा. सौ. शैलजा खेडेकर, मा. नारायण चव्हाण यांची दि. २३/४/२०१० ची उपसूचना.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १५, दि. २३/४/२०१०.

विषय – उद्यान विभागाकडील सहाय्यक उद्यान अधिक्षक ( वृक्ष ) वर्ग २ ( जुनी वे.श्रे.रू.६५००/– ते रू.१०५००/– + मान्य भत्ते ) नवीन पे बॅन्ड रू. ९३००/– ते रू. ३४८००/– + ग्रेड पे रू.६७००/– + मान्य भत्ते ) या पदाचे निवडयादी / प्रतिक्षायादी बाबत.

–––

मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले, शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

विषयांकित मा.आयुक्त साहेब यांनी पाठविलेल्या विषय पत्रामध्ये नमूद केलेल्या निवड यादी व प्रतिक्षा यादीतील दोन्ही उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, अनुभव त्यामध्ये मिळालेले मार्क महापालिकेमधील कामाचा विचार करता दराडे सचिन सुरेश यांना निवडयादी मधील नाव ही समिती प्रतीक्षायादीवर घेत आहे व प्रतिक्षायादीतील सौ.प्रिती सिन्हा यांना निवड यादीमध्ये घेण्यात येत आहे.

सौ.सिन्हा M.S.C. पर्यंत शिक्षण घेतलेल्या आहेत व त्यामध्ये त्यांना ८६ टक्के मार्क असल्याने त्यांची निवड करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ८१</u>

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र . मआ /नअ /९१०, दि. २२/२/२०१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १६, दि. २३/४/२०१०.

–––

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –––

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे डिसेंबर ०९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. च्या माहितीची नोंद घेवून मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कात्रज सं.क्र.१० पै | एस.आर.ए. | श्री.जयंत शहा | सी | २७७३३.३२ | ०००३८५० ते ०००३८५५ | ३०.१२.०९ |

**संकिर्ण**

<u>विषय क्र. ८२</u>

पुढील दोन महिने म.न.पा. मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मान्य करणेबाबतचे मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. १९/४/२०१० चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– १०/५/२०१०.

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**